नागपूर महानगरपालिकेची **विशेष सभा बुधवार दिनांक १३/१०/२०२१ रोजी सकाळी ११.००** महानगरपालिकेच्या मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ५. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ६. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ७. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ८. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| ९. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १०. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| ११. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १२. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| १३. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| १४. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| १५. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| १६. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| १७. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| १८. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| १९. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २०. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| २१. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| २२. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| २३. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| २४. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| २५. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| २६. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| २७. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| २८. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| २९. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ३०. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ३२. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ३३. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ३४. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ३५. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ३६. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ३७. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ३८. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ३९. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ४०. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ४१. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ४२. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ४३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ४४. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ४५. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ४६. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ४७. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ४८. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ४९. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

## <u>अनुपस्थित सदस्य</u>

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ३. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ५. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ६. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ७. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ८. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ९. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १०. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| ११. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १२. | ५ | अ | रिक्त | |
| १३. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| १४. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १५. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १६. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १७. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १८. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १९. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| २०. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २१. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २२. | ८ | ब | रिक्त | |
| २३. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| २४. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| २५. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २६. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| २७. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २८. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २९. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| ३०. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| ३१. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| ३२. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३३. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ३४. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| ३५. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३६. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ३७. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३८. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ३९. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ४०. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ४१. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ४२. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ४३. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ४४. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४५. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ४६. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४७. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ४८. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ४९. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ५०. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ५१. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ५२. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ५३. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ५४. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ५५. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ५६. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ५७. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ५८. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५९. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ६०. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ६१. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ६२. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ६३. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ६४. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ६५. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ६६. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ६७. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ६८. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ६९. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ७०. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ७१. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ७२. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ७३. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ७४. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ७५. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ७६. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ७७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ७८. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ७९. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ८०. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ८१. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ८२. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ८३. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ८४. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ८५. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ८६. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ८७. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ८८. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ८९. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ९०. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ९१. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ९२. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ९३. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ९४. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ९५. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ९६. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ९७. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ९८. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ९९. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| १००. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| १०१. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| १०२. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| १०३. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| १०४. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| १०५. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| १०६. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १०७. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी.** **निगम आयुक्त**
**डॉ.रंजना लाडे** **निगम सचिव**

**मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.**

**वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.**

**ठराव क्रमांक १९२ वि.क्र.८६:-**
**{वित्त विभाग}**

मा.सदस्यांनी शहरातील खराब रस्त्यांच्या दुरूस्तीबाबत केलेल्या तक्रारीची निकड लक्षात घेता मा. महापौर यांनी दिनांक 27.09.2021 च्या विशेष सभेत दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विषयाची अंदाजपत्रकात तरतूद करून म.न.पा. सभागृहासमोर पुर्नविलोकन प्रस्ताव सादर करण्याबाबचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला.

महापौर :- आज की इस विशेष सभा मे मैं आप सभी का हार्दिक स्वागत करता हुं। प्रशासन ने जो प्रस्ताव सादर किया है कृपया वह सभागृह के पटल पर रखे।

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी (श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी, मा.सदन, आज या ठिकाणी Re-Appropriation चा प्रस्ताव मी सादर करीत आहे. हा प्रस्ताव सादर करीत असतांना शहरातील रस्त्यांच्या

कामाचे प्रस्ताव जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्याने तसेच सदर कामासाठी असलेल्या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुद कमी पडत असल्यामुळे या लेखाशिर्षकामध्ये प्रस्तावित करण्यांत आलेल्या कामाना अतिरिक्त तरतुद उपलबध करुन देणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे लेखाशिर्षकांतर्गत तरतुद उपलब्ध करुन देतांना ज्या लेखाशिर्षकामध्ये जास्तीची प्रस्तावित करण्यांत आलेली कामे आहे त्या लेखाशिर्षकांत वाढ प्रस्तावित असून ज्या लेखाशिर्षकांतर्गत कामे कमी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. त्या लेखाशिर्षकांच्या तरतुदीमध्ये बचत होत असल्याने वरील लेखाशिर्षकाच्या अंतर्गत तरतुदीच्या समायोजनाचा प्रस्ताव सादर करण्यांत येते. वरील प्रस्ताव सादर करीत असतांना आजच्या उत्पन्नाच्या स्थितीचा सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. १५.१२ अक्टोबरपर्यंत महानगरपालिकेचे एकुण उत्पन्न १२५६ कोटी इतके आहे. एकंदरीत बजेटच्या संदर्भात सात महिन्याचे १६३१ कोटी रुपये यावयास पाहिजे होते. परंतु १२५५ कोटी रुपये आले जे एकुण सात महिन्याच्या प्रमणात ७७ प्रतिशत म्हणजे २३ प्रतिशत आपण उत्पन्नात मागे आहे. आणि यामधुन जर आपण ८६ कोटी वॉटर वर्क्सचे कमी केल्यास  ते प्रमाण २८ प्रतिशतने कमी होत आहे. हा संदर्भ लक्षात घेता सदरचा समायोजनाचा प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. या प्रस्तावामध्ये क्रिंडांगण सुस्थिती व दुरुस्ती करणे तसेच कॉक्रिंटीकरण शेवटचा हेडचा नंबर आहे ८०७ यामध्ये महानगरपालिकेच्या महासभेने ४०० लक्ष ठेवले होते, आता यामध्ये आम्ही ३०० लक्ष कमी करुन १०० लक्ष ठेवतो आहे. नगररचनेचा हेड आहे शहर विकास योजनेचा प्रस्तावित आराखडा तयार करणे यामध्ये महासभेने ५०० लक्ष ठेवले होते यामध्ये ४०० लक्ष कमी करुन आम्ही १०० लक्ष ठेवतो आहे. त्यानंतर सार्वजनिक मोठया स्वरुपाच्या यात्रा व उत्सव मेळावे इत्यादीसाठी म.न.पा.व्दारे जबाबदारी म्हणुन करावयाची कामे यामध्ये ३०० लक्ष ठेवण्यांत आले होते यामधुन १५० लक्ष कमी करुन १५० लक्ष रुपयांची तरतुद ठेवतो आहे.  त्यानंतर शहरातील रस्त्यावरील खडडयांची सुस्थिती व दुरुस्ती यामध्ये १५०० लक्ष ठेवण्यांत आले होते यामधुन ८०० लक्ष कमी करुन ७०० लक्ष ठेवण्यांत येत आहे. यानंतर कॅपिटल हेडमध्ये एकात्मिक रस्ते सुधारणा यामध्ये ९००० लक्ष ठेवण्यांत आले होते, त्यापैकी १,००० लक्ष कमी करुन ८,००० लक्ष करण्यांत येत आहे. तसेच शहरातील नदी नाले यांचे प्रकल्प राबविणे NRCP व NLOP या कामासाठी २९०० लक्ष ठेवण्यांत आले होते यापैकी १००० लक्ष कमी करुन १९०० लक्ष करण्यांत येत आहे.अश्याप्रकारे एकुण ३७५० लक्ष रुपयांच्या तरतुदीची बचत प्रस्तावित करण्यांत आलेली असून ही बचत खालीलप्रमाणे विविध लेखाशिर्षकामध्ये वाढविण्यांत येत आहे. हॉट मिक्सव्दारे रस्त्यांचे डांबरीकरण ८०८ हेडमध्ये आधी प्रस्तावित ५०० लक्ष होते यामध्ये ८०० लक्षांची वाढ करुन एकुण तरतुद १३०० लक्ष करण्यांत येत आहे. दुसरा हेड आहे शहरातील इतर रस्त्यांचे डांबरीकरण सुस्थिती व दुरुस्ती हेड ८०२ यामध्ये ३५०० लक्ष तरतुद ठेवण्यांत आली होती, आता यामध्ये ८५० लक्ष वाढ करण्यांत येत असून आता नव्याने तरतुद ४३५० ठेवण्यांत येत आहे. त्यानंतर संत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम ५११ यामध्ये एकुण तरतुद ६३१५.५१ लक्ष होती यामध्ये १ हजार लक्ष वाढ करुन ७३१५.५१ करण्यांत येंत आहे. तसेच नागरी घनकचरा व्यवस्थापन याची शास्त्रोक्त अंमलबजावणी व इतर खर्च या पदाअंतर्गत १०३२८.२६ लक्ष ठेवण्यांत आलेले होते यामध्ये १ हजार लक्ष वाढ करुन ११३२८.२६ करण्यांत आली आहे असे एकुण ३ हजार लक्ष रुपयांची बचत होईल, असे एकुण ४ पदांतर्गत ३६५० लक्ष रुपयांची वाढ करण्यांत येत आहे.

श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, प्रशासनानी सर्व्हे केला होता कि आपल्याला एकुण किती तरतुद रस्ते विकासासाठी लागणार आहे, आणि तो आंकडा आपल्याला सादर केलेला आहे, याच्यामध्ये याची पूर्तता होते काय ? याची माहिती देण्यांत यावी.

अधिक्षक अभियंता (श्री.अजय पोहेकर) :- मा.महापौरजी, मा.सत्तापक्षनेता यांनी विचारलेल्या प्रश्नाबद्यल प्रशासनानी पहिले डांबरी रस्त्यांचे सर्व्हेक्षण केले होते त्यामध्ये १६ कोटी रुपयांचे रस्त्यांचे काम प्रस्तावित केले, परंतु सध्याच्या निविदा पाहता १३ कोटी रुपयामध्ये हे काम पुर्ण होतील यामध्ये ५ कोटीच्या ऐवजी १३ कोटी रुपयांची वाढ करण्यांत आलेली आहे, या प्राकलनामध्ये रस्त्यांचे प्रस्तावित केलेले काम पुर्ण होतील.

श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, या व्यतिरिक्त इतर कुठल्या हेडमध्ये रस्त्यांच्या कामामध्ये सेव्हींग आलेली आहे काय ? याची माहिती प्रशासनानी द्यावी.

अधिक्षक अभियंता (श्री.अजय पोहेकर) :- मा.महापौरजी, रस्त्यांच्या कामामध्ये सेव्हींग नाही, मागणी जास्त प्रमाणात आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, हे आकडे जे दिले आहे ते वस्तुस्थितीला धरुण आहे काय ?

अधिक्षक अभियंता (श्री.पोहेकर) :- मा.महापौरजी, हे प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करुनच आकडे काढले होते आपल्याकडे जेवढया नगरसेवकांच्या डिमांड आल्यात त्या आधारावर करण्यात आले आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, आपण जी तरतुद केली आहे तर ते कामे होतील काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, या ठिकाणी मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो एकंदरीत या वर्षी आपण जास्तीत जास्त कामाला मंजूरी दयावी हे निर्देश होते त्यामुळे ऑलरेडी बजेटच्या सुरुवातील उत्पन्नाच्या माहिती दिली होती. ३० टक्के उत्पन्न असतांना सुध्दा जवळपास दिले आहे. विकासाची मागणी जर प्रत्यक्ष पाहिली तर शेकडो कोटी असु शकते परंतु हे सर्व करीत असतांना उपलब्ध निधी सुध्दा लक्षात घेतली पाहिजे. आज प्रशासनाला सर्वांचे कामे होईल काय असे प्रशासनाला बोलणे उचित राहणार नाही. आपण जास्तीत जास्त लोकांना या वर्षी रस्त्यांची परिस्थिती पाहता बजेटमध्ये आपल्याकडे खुप मोठया संख्येने हेड आहे. तरी सुध्दा आपण आवश्यकते प्रमाणे उपलब्ध निधीच्या अधीन राहुन मागच्या वेळी आपण उत्पन्नाचा आढावा घेतला होता ए.डी.टी.पी विभागामध्ये ऑलरेडी आपण टारगेट अचिव्ह केले आहे. आणखी दुप्पट टारगेट अचिव्ह करण्याचे नियोजन केले आहे. हे सर्व गृहीत धरुन आज रोजी कुठल्याही प्रकारचा कट प्रस्तावित न करता जरी वस्तुस्थिती तशाप्रकारची असली तरी आपण जास्तीत जास्त निधी रस्त्यांच्या विकासाकरीता उपलब्ध प्रस्तावाच्या अनुषंगाने आपण तयार करुन देत आहे. यामध्ये दोन ते तिन महत्वाचे मुद्ये आहे. जे रस्ते आपण नियोजनाध्ये घेतले आहे ते रस्ते कमी होणार नाही. समायोजन करीत असतांना आपल्याला ही गोष्ट

लक्षात ठेवणे आवश्यक आहे की कुठलाही हेड उचलुन दुस-या हेडमध्ये टाकणे हे पॉसिबल नाही आणि नियमाला अनुसरुन नाही या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन जेथे ३ कोटीमध्ये होणार नाही तेथे १३ कोटी रुपये प्रस्तावित केले आहे. प्रशासनाचा प्रयत्न असा राहणार की तीन ते चार कामांचा हेड बघता जेथे आवश्यक कामांचा प्रस्ताव होतील तेवढे मात्र कामे होतील काय असा शब्द देणे कठीन आहे. याचा आधार दोन गोष्टीमध्ये आहे. यामध्ये उपलब्ध तरतुद राहील आणि उपलब्ध निधी राहील, निधीच्या संदर्भात आम्ही कार्यकेले आहे मात्र तरतुदीच्या अनुषंगाने आतापर्यत जे आवश्यक आहे त्यामध्ये ५०२ चा हेड वाढविले आहे. ५११ वाढविले आहे, ८०८ वाढविले आहे त्याच्यामुळे मला जी तीन प्रमुख मागणी असते शहरामध्ये त्या तीन हेडमध्ये पुरेसा निधी दिला आहे असे मला वाटते. या ठिकाणी एक स्मॉल ॲर्नॅलिसीस केले होते. मागच्या पाच वर्षामध्ये किती कामे या चार ते पाच हेडमध्ये दिले होते. महासभेने मंजूर बजेटच्या तुलणेमध्ये ते सुध्दा सन्माननिय सदस्यांना काढायला पाहिजे. २०१६-२०१७ पासून आपण काढले आहे. २०१६-२०१७ चे ८०२ पदाचे आपण बघितले तर जास्तीतजास्त ७० टक्के मंजूरी तरतूदीच्या अनुषंगाने नियोजन दयायचे होते. आज रोजी ९६ टक्के दिले आहे आणखी आपण वाढविले आहे. त्यामध्ये १२० टक्के कामे आपण करणार आहोत. ५११ या हेडमध्ये २०१६ ते २०२० - २०२१ पर्यतचे पाहिले तर ३३ टक्क्यांचे प्रावधान दयायचे होते ते ६५ टक्क्यापर्यत जास्तीत जास्त देण्यात आले होते. त्या हेडला ऑलरेडी आपण ८० टक्क्यांच्या पुढे गेलो आहे. त्यामध्ये सुध्दा १० टक्के वाढविले आहे. यामध्ये दोन गोष्टी लक्षात ठेवायला पाहिजे की शहरातील रस्त्यांच्या परिस्थितीची गंभीर स्वरुपात प्रशासनाने नोंद घेतली आहे नुसती नोंद घेतली नसुन ते कामाला सुध्दा लागले आहे व वेळेवर कामाला लागलो आहे. या सर्व गोष्टी मी सभागृहाला आवर्जुन नमुद करु इच्छितो. मॅक्झिमम आपण पॉसीबल केलेले आहे. यामध्ये आपण सगळे व्यवस्थित केल्यामुळे हा एक अंदाज आहे. **आमच्याकडे हातात असलेल्या प्रस्तावाच्या मॅक्झिमम जेथे जेथे आवश्यक कामे मार्गी लागू शकतात अशी अपेक्षा आहे. केस टू केस मध्ये आपण निर्णय घेवू शकतो . धन्यवाद**

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, सबसे पहिले तो मै आपका बहोत बहोत अभिनंदन करना चाहूँगा,और साथ ही साथ मा. स्थायी समिती अध्यक्ष और मा.आयुक्त का भी अभिनंदन करना चाहूँगा की रस्ते की दुर्दशा देखते हूए गड्ढो की जटील समस्या को आपने तुरंत ध्यान देके यह विषय सभागृह मे आपने आगे बढाया l सबसे पहिले आपने ३६.५० कोटी की जो अतिरिक्त तरतुद की है उसके लिये आपको बहोत बहोत बधाई देता हूँ l उसके साथ ही ८०२, ८०८ और ५११ जो महत्वपुर्ण हेड है जिसके द्वारा शहर के मॅक्झिमम रस्तो को बहोत लाभ होता है l ऐसे सभी हेड मे आपने ज्यादा की तरतूद उपलब्ध करके दी उसे लिए मै आपका अभिनंदन करता हूँ l मै प्रशासन के माध्यम से अधिक्षक अभियंता पोहेकर साहब ने जिसप्रकार से बताया की टेंडर का जो पॅटर्न है उसमे बहोत सारे टेंडर बिलो आये है l २० से २५ परसेंटसे टेंडर बिलो जा रहे है l और यह जो बचत है यह अपने लिये बहोत अच्छी खबर है l इसके माध्यम से ज्यादा से ज्यादा रस्ते बनाने के लिए मदत होगी l यह प्रशासन के माध्यम से यह चीज पता चली है l मा.आयुक्त महोदय ने बताया की इस साल ज्याद की तरतूद की है, परंतु पीछले दो साल से रस्तो के लिए कुछ भी प्रावधान उपलब्ध नही हुआ यह भी

इम्पोर्टटेंट चीज है l मै आयुक्त महोदय का भी अभिनंदन करुंगा की आयुक्त महोदय भी अकस्मात पध्दती से शहर के रस्तो के लिए आपके साथ बैठके एक अच्छा अतिरिक्त प्रावधान उपलब्ध करने के लिए मदत की है l मा.महापौरजी, मै आपसे एक निवेदन करना चाहता हूँ, हसनबाग चौक से जो मा.सदस्या रेखाताई साकोरे के घर के सामने जो रस्ता है वो २० फुट का रस्ता था वो छुट गया था, डीपी रोड है वो भी सिमेंट रोड प्रस्तावित था पर हुआ नही l अभी पाईपलाईन का काम कम्प्लीट कर दिया है l मेरा आपसे नम्र निवेदन है , हसनबाग चौक से रमणा मारुती चौक तक का जो रस्ता है वह सिमेंट रोड के लिए निधी उपलब्ध की जाये ऐसी मेरी विनंती है l दुसरा, मा.महापौरजी, ईश्वरनगर चौक से शिवमंदीर तक जो १५० मिटर का पॅच सिमेंट रोड का छुट गया था l एक कार्नर का घर है उसका स्टॅन्डर्ड पोर्शन काटने का काम एनआयटी का था परंतु एनआयटी और नागपूर कार्पोरेशन का तालमेल नही हुआ l मै निवेदन करुंगा की यह दोनो एजन्सी को दिखाने के स्टॅन्डर्ड पोर्शन निकाले के जो १५० मीटर का पॅच छुट गया है वह भी करने के लिए आपसे मेरा नम्र निवेदन है यही मेरी आपसे विनंती है यह आप मान्य करेंगे, धन्यवाद।

श्री.प्रकाश भोयर:- मा.महापौरजी, मी परवा मा.आयुक्तांना एक पत्र दिले होते, पत्रामध्ये असे होते मा.महापौरजी, आपल्या स्थायी समितीमध्ये मला पकडून १६ सदस्य आहेत. मागचे कामे आणि आवश्यक असलेल्या कामांना आतापर्यंत आपण प्राधान्य दिले. स्थायी समितीचे जे १५ मा.सदस्य आहेत त्यांची बहुतेक नवीनच कामे आहेत तर काही जुने कामे होते ते जुने कामे त्यांची झालेत. परंतु नवीन कामे आहेत मा.सदस्यांची त्यांना प्रायरिटी देण्यात यावी. ते मा.स्थायी समिती सदस्य असून त्यांच्या कोणत्याच कामांना मंजुरी दिली नाही. त्यामुळे माझी आपल्या मार्फत आयुक्तांना विनंती आहे की स्थायी समिती सदस्यांना न्याय दिला पाहिजे व जास्तीत जास्त निधी स्थायी समिती सदस्यांना देण्यात यावा परंतु याचा अर्थ असा नाही बाकीच्या सदस्यांचा सुध्दा हिशोब करावा. मी मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो आणि मा.महापौरजी आपले सुध्दा अभिनंदन करतो की ३६.५० कोटी रुपये दिल्याबद्यल, परंतु स्थायी समितीमध्ये सदस्य असतांना त्यांना काहीच कामे मंजूर झाले नाही अशा मा.सदस्यांचा आपण विचार करावा ही विनंती मी करतो.

श्री.अविनाश ठाकरे :- **मा.महापौरजी, हा विषय मंजूर करावा परंतु मंजूर करतेवेळी मा.आयुक्तांनी वक्तव्य केले ३ करोड रुपयांचे सेव्हींग १५ करोड रुपयांच्या कामामध्ये आले आहे तसेच सेव्हींग या कामामध्ये येऊ शकते त्या सेव्हींग मधुन जे रस्ते खराब झाले आहे व ते सुटले असेल तर त्याला सुध्दा मान्यता दयावी या सुचनेसह हा प्रस्ताव मंजूर करावा.**

वरील चर्चेनंतर मा.सदस्यांनी शहरातील खराब रस्त्यांच्या दुरूस्तीबाबत केलेल्या तक्रारीची निकड लक्षात घेता मा. महापौर यांनी दिनांक 27.09.2021 च्या विशेष सभेत दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विषयाची अंदाजपत्रकात तरतूद करून म.न.पा. सभागृहासमोर पुर्नविलोकन प्रस्ताव सादर करण्याबाबचा प्रश्न सभागृहाने विचारात घेऊन दिनांक 27/09/2021 च्या सभागृहात दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रशासनानी 15 दिवसाच्या आत हा प्रस्ताव सभागृहासमोर आणुन आपली कार्यबध्दता सिध्द केल्याबद्यल मी प्रशासनाचे मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. **मा.विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी**

**वनवे, मा.सत्तापक्ष नेता श्री.अविनाशजी ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष श्री.प्रकाशजी भोयर, पूर्व स्थायी समिती अध्यक्ष श्री.पिंटु झलके इनकी सूचनाओ के साथ संबंधित राशी की निविदा पश्चात संबंधित कार्य मे जो बचत होंगी उस बचत राशी का भी समावेश विकास कार्य मे प्रशासन करे, ऐसे निर्देश दिये जाते है,** साथ ही उपरोक्त सदस्यो की सूचना के साथ यह विषय मंजूर किया जाता है या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **महापौर** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **नागपूर महानगरपालिका,नागपूर** |